**कोल्हापूर जिल्हा परिषद (बांधकाम विभाग ) कोल्हापूर**
**निर्लेखित साहित्य जाहिर लिलाव विक्रीच्या शर्ती व अटी**

कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील विविध विभागांच्या निर्लेखित कर ावयाच्या जुने लाकडी व इतर निरुपयोगी साहित्य इ. चा जाहिर लिलावाने जशी आहे त्या स्थितीत दिनांक १५/०१/२०२४ रोजी ११.०० वाजता कागलकर हाऊस, जिल्हा परिषद कोल्हापूर , नागाळा पार्क , कोल्हापूर येथील आवारात विक्री करणेत येणार आहे.

जुने लाकडी व इतर निरुपयोगी साहीत्याचा लिलाव लॉटने पुकारला जाईल.

**शर्ती** - १. लिलाव बोली बोलण्यापूर्वी रु २०००/- ची अनामत रक्कम जमा करावी. त्याशिवाय बोलीमध्ये भाग घेता येणार नाही . सदची रक्कम ही बांधकाम खात्याकडे लिलावाचे दिवशी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत डी.डी ने जमा करणेचे आहे.

२. सदर लिलाव तीन वार करुन शक्य झालेस त्याच दिवशी पुर्ण केला जाईल.

३. इच्छूक बोलिदारांना लिलावात काढलेले साहित्य लिलावापुर्वी ८ दिवस आधीपासून कागलकर हाऊस इमारतीच्या मागील बाजूस पाहण्यासाठी उपलब्ध आहे. बोलिदारांनी साहीत्याची तपासणी केली आहे असे गृहीत धरून नंतर साहीत्याची कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

४.सर्व लाकडी व इतर निरुपयोगी साहित्य जसे आहे तसे व आहे त्या स्थितीत विक्री केले जाईल. सदरचे साहित्य बोली मंजूर झालेल्या खरेदीदाराने आहे त्या स्थितीत स्वखर्चाने नेणेचे आहे

. ५.लिलाव रकमेच्या २५% रक्कम लिलावाची बोली पूर्ण होताच रोखीने अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल व बाकीची रक्कम लिलाव मंजूर झालेनंतर १० दिवसांचे आत भरणेची आहे.उर्वरीत रक्कम ठरवून दिलेल्या १० दिवसांच्या मुदतीत न भरल्यास १३% दराने व्याज आकारण्यात येईल व सदरची मुदत ही १५ दिवसाची असेल. विक्री किमतीची उर्वरित रक्कम खरेदीदाराने मुदतीत न भरल्यास त्याची अनामत रक्कम जप्त केली जाईल व विक्री रद्द करणेत येईल.

६.यशस्वी बोलीदाराला विकत घेतलेल्या साहित्याच्या खरेदीच्या रकमेवर नियमानुसार विक्रीकर व इतर सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे बंधन कारक राहील. कोणतीही सूट मिळण्याचे प्रमाणापत्र लिलाव खरेदीदाराला मिळणार नाही.

७.यशस्वी बोलीदाराकडून २५% टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर पुर्ण रक्कम भरेपर्यंत लिलावाच्या साहित्याची जबाबदारी बोलीदाराची राहील व त्यास जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

८.बोलीदाराने पुर्ण रक्क्रमेचा भरणा केल्यानंतरच संबंधित साहित्य जिल्हा परिषदेच्या आवारातून १५ दिवसांच्या आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे. अन्यथा प्रति दिन रु १००/-(रुपये शंभर फक्त) इतका दंड आकारण्यात येईल. साहीत्याची उचल मुदतित न केलेस लिलाव नामंजुर करुन अनामत रक्कम खास जमा करुन घेणेत येईल.

९. लिलाव खरेदीदाराने साहीत्य ताब्यात घेताना जिल्हा परिषदेच्या इमारतीचे / मालमत्तेचे नुकसान झालेस लिलाव खरेदीदाराला झालेल्या नुकसानीबाबत जबाबदार ठरविण्यात येईल.

१०. कोणत्याही बोलीदाराची बोली कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार खाली सही क रणारे स्वाक्षरीदार यांचेकडे राहतील.

११. एकदा जाहीर केलेल्या मालाचा/ साहीत्याचा लिलाव कोणतेही कारण न देता स्थगीत अथवा रदद करण्याचा अधिकार खाली सही क रणारे स्वाक्षरीदार यांचेकडे राहतील.

सही/-

**कार्यकारी अभियंता ( बांधकाम)**
**जिल्हा परिषद ,कोल्हापूर**

सही/-

**अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,कोल्हापूर**

**जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**बांधकाम विभाग,**
**जाहीर लिलाव नोटीस क्रमांक. ०१ (२०२३-२४)**

शिक्षणविभाग जि.प.कोल्हापूरकडील जुने लाकडी व इतर निरुपयोगी साहीत्य जाहीर लिलावाने विक्री करणेचे आहे. सदर चे साहीत्य जसे आहे त्या स्थितीत दि.१५/०१/२०२४ रोजी ११.०० वाजता जाहीर लिलावाने विक्री करणेत येणार आहे. सदर साहित्य इमारत उपविभाग कागलकर हाऊस परिसर येथे पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

जुने साहित्य लिलावाबाबतची सविस्तर निटीस व इतर माहिती कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या www.zpkolhapur.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**कार्यकारी अभियंता(बांधकाम)**
**जिल्हा परिषद,कोल्हापूर**

सही/-
**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,कोल्हापूर**